ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५५ • शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# दुष्काळ निवारणासाठी शासन कटिबद्ध;निधी कमी पडू देणार नाही!

## पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ऑगस्ट २०२७ पर्यंतचे नियोजन;उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश



नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळ आणि पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच प्रभावी नियोजन घ्यावी. दुष्काळ निवारणासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज येथे दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील दुष्काळ, पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आ.प्रतापराव पाटील-चिखलीकर, आ.भीमराव केराम, प्र.जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, जि.प.चे सीईओ महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन, मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी ऑगस्ट २०२७ पर्यंतचा सर्वसमावेशक पाणीपुरवठा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. टंचाईग्रस्त गावांना आवश्यकतेनुसार तातडीने टँकर मंजूर करावेत. यामध्ये कोणताही विलंब खिंव्रा हयगय होता कामा नये. प्रत्येक तालुक्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. तसेच जिल्हास्तरावर चोवीस तास कार्यरत नियंत्रण कक्ष स्थापन करून सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना निधीअभावी प्रलंबित राहू नयेत.१९ नोव्हेंबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेतील (डीपीसी) निधीचा योग्य वापर करावा. डीपीसी मधून निधी देणे शक्य नसलेल्या कामांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. चारा टंचाईवर उपाययोजना करताना ज्या शेतकऱ्यांकडे पाणी उपलब्ध आहे, त्यांना चारा पिकांचे बियाणे वितरित करावे. या शेतकऱ्यांकडून शासन योग्य दराने चारा खरेदी करणार असल्याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्याबाबत व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांना बँकांनी सिबिल स्कोरची अट न घालता तातडीने सुलभपणे पीक कर्ज **पान ४ वर**

## वंचित शेतकऱ्यांच्या प्रकरणांची शासनाकडून छाननी सुरु

मुंबई/प्रतिनिधी-शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत मदतीची रक्कम जमा झालेली नाही.त्यामुळे अशा प्रकरणांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांना मदत देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे मदत व पुनर्वसन विभागाने स्पष्ट केले आहे. आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न नसणे, वारस नोंदींतील त्रुटी, नावातील तफावत आणि फार्मर आयडीमधील विसंगती यांसारख्या तांत्रिक कारणांमुळे अनेक शेतकऱ्यांचे मदत वितरण रखडले आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील पात्र शेतकऱ्यांना पीक नुकसानीपोटी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार आर्थिक मदत दिली जात आहे. ग्रीस्टॅक प्रणालीवर राज्यातील सुमारे एक कोटी ३० लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, त्यांना फार्मर आयडी देण्यात आले आहेत. यापैकी सुमारे ९४ लाख पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जमा करण्यात आली आहे. मात्र, काही शेतकऱ्यांच्या नोंदींमध्ये त्रुटी असल्याने मदत वितरणात अडथळे निर्माण झाले आहेत.आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न नसल्यामुळे काही व्यवहार अयशस्वी झाले आहेत. तसेच जमिनीच्या वारस नोंदी, नावातील तफावत, प्रतिबंधित **पान ४ वर**

# पंतप्रधान मोदींचा बारामती दौरा रद्द

## प्रेरणास्थळाचे उद्घाटन शरद पवारांच्याच हस्ते



बारामती:पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या बारामतीतील प्रेरणास्थळाच्या उद्घाटन सोहळ्याबाबत अखेर मोठा बदल झाला आहे. मोदी यांचा प्रस्तावित बारामती दौरा तूर्तास रद्द करण्यात आला असून, या प्रेरणास्थळाचे उद्घाटन आता १२ डिसेंबर रोजी खा. शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. खुद्द शरद पवार यांनीच याबाबत माहिती दिल्याने राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना नवे वळण मिळाले आहे.

बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या नक्षत्र उद्यान परिसरात हे प्रेरणास्थळ उभारण्यात आले आहे. विविध महापुरुषांचे विचार, कार्य आणि सामाजिक योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे. या वास्तूच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे मोदी बारामतीच्या दौऱ्यावर येणार का, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली होती.या उद्घाटन सोहळ्यासाठी यापूर्वी ३ नोव्हेंबरची तारीख निश्चित झाल्याची चर्चा होती. मात्र, नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. त्यानंतर १६ नोव्हेंबर रोजी मोदी बारामतीत येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मात्र, या दिवशीही दौरा होऊ शकला नाही. अखेर आता उद्घाटनाची जबाबदारी शरद पवार यांच्याकडे सोपविण्यात आली असून, १२ डिसेंबर ही नवी तारीख निश्चित झाली आहे.दरम्यान, पंतप्रधान मोदी यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यावरून राजकीय वर्तुळात टीका झाली होती. विशेषतः एसआयआरच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीकडून केंद्र सरकारविरोधात आंदोलने सुरू असताना, आघाडीचे घटक असलेल्या शरद पवारांनी मोदींना निमंत्रण दिल्याने विरोधकांकडून सवाल उपस्थित करण्यात आले होते. अशा राजकीय पार्श्वभूमीवर मोदींचा बारामती दौरा रद्द झाल्याने या घडामोडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रस्तावित दौरा नेमका कोणत्या कारणामुळे रद्द करण्यात आला, याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. त्यामुळे या निर्णयामागील कारणांबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

# कार-कंटेनरची भीषण धडक;तरुणाचा जागीच मृत्यू

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद-बाभळी फाटा मार्गावर कार आणि कंटेनर वाहनाची भीषण धडक होऊन दुर्दैवी अपघात घडला. या दुर्घटनेत अवघ्या १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत प्रवास करणारा २० वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला. गुरुवार, दि.१९ रोजी सायंकाळच्या सुमारास हा अपघात घडला.

या भीषण अपघातात श्रीनाथ गंगाधर येवतीवाड वय १८, रा. मंगनाळी, ह.मु. रसिकनगर, धर्माबाद याचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर धनराज मिनाजी लखमावाड वय २०,



रा. रत्नाळी हा गंभीर जखमी झाला आहे. दोघेही एमएच ०१ सीटी ०२२६ क्रमांकाच्या कारमधून प्रवास करीत असताना टीजी १६ टी ४२१७ क्रमांकाच्या कंटेनरने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारमधील दोघांनाही गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमींना तातडीने धर्माबाद येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. श्रीकांत पाटील यांनी प्राथमिक उपचार केले. मात्र, उपचारा दरम्यान श्रीनाथ येवतीवाड याची प्राणज्योत मालवली. तर धनराज लखमावाड याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी अन्य रुग्णालयात पाठविण्यात आले. दरम्यान, धर्माबाद पोलिसांनी अपघातातील वाहन व चालकाला ताब्यात घेतले असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# अकवान चक्रीवादळाचा आंध्र प्रदेश,ओडिशाला तडाखा

## मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

भुवनेश्वर:देशातील अनेक राज्यांमध्ये अकवान चक्रीवादळाचा प्रभाव जाणवू लागला असून, ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला वादळाचा जोरदार तडाखा बसला आहे. ओडिशाची राजधानी भुवनेश्वरमध्ये मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचे वारे वाहत आहेत. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास वादळाचा प्रभाव तीव्र झाला. गोपाळपूरजवळ चक्रीवादळाने किनारपट्टी ओलांडताना वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ८० किलोमीटर, तर वाऱ्याच्या झोतांचा वेग ताशी ९० किलोमीटरपर्यंत पोहोचला होता.

अमरावती हवामान केंद्राचे संचालक डॉ. के. नागरत्न यांनी दिलेल्या माहितीनुसार, चक्रीवादळाने सकाळी ७.३० ते ८.३ या वेळेत गोपाळपूरजवळून किनारपट्टी ओलांडली. सध्या ही वादळ प्रणाली गोपाळपूर आणि पुरी परिसराच्या जवळ असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील २४ तासांत चक्रीवादळाची प्रणाली ईशान्येकडे आणि लगतच्या राज्यांच्या दिशेने सरकण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, गेल्या २४ तासांत उत्तर आंध्र प्रदेशात अतिवृष्टी झाली आहे. श्रीकाकुलम आणि अनाकापल्ली जिल्ह्यांतील ५० टक्क्यांहून अधिक हवामान केंद्रांवर हलक्या ते जोरदार पावसाची नोंद झाली. इच्छापुरम आणि मंदसा परिसरातील अनेक ठिकाणी १२ सेंटीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. त्यामुळे किनारपट्टी भागातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.एकीकडे पूर्व किनारपट्टीवर चक्रीवादळाचा प्रभाव जाणवत असताना, दुसरीकडे उत्तर भारतात थंडीचा कडाका वाढला आहे. जम्मू-काश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात झालेल्या हिमवृष्टीमुळे मैदानी भागात थंड वारे वाहू लागले आहेत. दिल्लीत या हंगामात प्रथमच थंडीची तीव्रता जाणवली असून, **पान ४ वर**

# माहूरच्या जंगलात अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यातील मौजे गुंडवळ ते तांदळा रस्त्यालगत असलेल्या घनदाट जंगलात अज्ञात अदाजे ५५ ते ६० वय असलेल्या पुरूषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह दि.१९ रोजी सायंकाळी आढळला.

गुंडवळ ते तांदळा हा रस्ता जंगलातून गेलेला असल्याने दोन्ही बाजूने घनदाट जंगल असून तुरळक प्रमाणात शेती आहे.दि.१९ रोजी गुराखी गुरे चारत असतांना त्यास मृतदेह दिसला असता गुंडवळचे तंटामुक्त अध्यक्ष प्रदीप जमदाडे यांना त्यांनी माहिती दिली. जमदाडेनी माहूर पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार गजानन चौधरी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. वैद्यकीय अधिकारी डॉ.टारपे यांनी जायमोक्यावरच शवविच्छेदन केले व तेथेच मुत्यदेह दफन करण्यात आले.मृतकाच्या अंगावर पांढरी धोती.पाढरा नेहरु काळ्या कलरचे रबरी बुढ आढळले.हा घातपात असल्याचा संशय असून माहूर पोलीस याचा शोध लावतील का, अशी चर्चा नागरिक करीत आहेत.



# देशातील संपत्तीचे केंद्रीयकरण तर सर्वसामान्यांचा गरजांसाठी संघर्ष-कॉ.नवले

## डॉ.व्यंकटेश काब्दे विवेक व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफताना केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका;शिक्षण आणि रोजगाराची सांगड घालण्याची गरज



नांदेड/प्रतिनिधी-देशातील संपत्तीचे केंद्रीकरण मोजक्या लोकांच्या हातात होत असून, दुसरीकडे सर्वसामान्य जनता मूलभूत गरजांसाठी संघर्ष करीत आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव तथा किसान सभेचे नेते कॉ.डॉ.अजित नवले यांनी टीका केली.

माजी खा.डॉ.व्यंकटेश काब्दे विवेक व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफताना देशातील परिस्थिती व विद्यार्थी-युवकांसमोरील आव्हाने या विषयावरील व्याख्यान व परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉ.विजय गाभणे हे होते तर या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलतांना त्यांनी देशातील संपत्तीच्या असमान वाटपाचा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी आर्थिक विषमता दिवसेंदिवस तीव्र होत असल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचा संदर्भ देत शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांकडे सरकारचे पुरेसे लक्ष नसल्याची खंत व्यक्त केली. गावांमधील पाणीपुरवठा, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, जनावरांचे संगोपन आणि ग्रामीण रोजगाराचे प्रश्न गंभीर होत आहेत. अशा परिस्थितीत दुष्काळ, पाणी, अन्न आणि रोजगार या प्रश्नांना प्राधान्य मिळायला हवे, असे ते म्हणाले.लोकशाही व्यवस्थेतील निवडणूक प्रक्रियेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. मतदार याद्यांमधील कथित अनियमितता, मतदानाच्या आकडेवारीतील विसंगती आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव याबाबत चिंता व्यक्त केली. लोकशाहीमध्ये जनतेला आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. मात्र, निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी पारदर्शकता आणि निष्पक्षता आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या बाजारीकरणावर टीका करताना गरीब आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणाच्या संधी मर्यादित होत असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाचा उद्देश केवळ पैसा कमावणे खिंव्रा नोकरी मिळवणे नसून विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्ये, समानता, सामाजिक जाणीव आणि जीवन जगण्याची समज विकसित करणे हा असायला हवा. मात्र, सध्याच्या **पान ४ वर**

# सावकारीविरुद्ध कठोर उपाययोजनांची गरज!

**शेतकऱ्यांच्या संकटाचा फायदा घेत वसुलीच्या नावाखाली माणुसकीचा गळा घोटला जात असेल, तर शासनाने केवळ विनवण्या करण्याऐवजी कठोर कारवाईचा बडगा उगारण्याची वेळ आली आहे! महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गडद होत चालले आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३१० वर पोहोचली असून अनेक भागांमध्ये धरणांतील पाणीसाठा गतवर्षीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात घटला आहे. मराठवाड्यातील पाण्याची स्थिती तर अधिक चिंताजनक आहे. सलग काही वर्षे अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि नैसर्गिक संकटांचा सामना करणारा शेतकरी आता पाणीटंचाईच्या विळख्यात सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतीचा खर्च, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि आरोग्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शेतकऱ्याला कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र, हेच कर्ज आज त्याच्या जिवावर उठत असेल, तर ही केवळ आर्थिक समस्या नसून व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी गंभीर बाब आहे.शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासनाकडून विविध योजनांच्या घोषणा केल्या जातात. मदतीची आश्वासने दिली जातात; परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात मदत पोहोचेपर्यंत अनेकदा त्याची परिस्थिती अधिकच बिकट झालेली असते. अशा वेळी खासगी सावकार आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जाचा विळखा त्याला अधिक असहाय बनवतो. कर्जाची परतफेड करण्यासाठी मुदत, परिस्थिती आणि आर्थिक क्षमता यांचा विचार करण्याऐवजी काही वित्तीय संस्था आणि वसुली प्रतिनिधींकडून दबाव, धमक्या आणि मानसिक छळाचा मार्ग अवलंबला जात असल्याच्या घटना समोर येत आहेत. कर्जवसुलीच्या नावाखाली माणुसकीच संपत चालली असेल, तर अशा व्यवस्थेला वेळीच लगाम घालणे आवश्यक आहे. नांदेडमध्ये खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात एका शेतकऱ्याची हत्या झाल्याची घटना अत्यंत धक्कादायक आहे. कर्जाच्या वसुलीशी संबंधित वादातून अशा प्रकारची हिंसक घटना घडत असेल, तर त्याकडे केवळ गुन्हेगारी घटना म्हणून पाहून चालणार नाही. दुसरीकडे विदर्भात रुग्णालयात उपचार घेत असलेल्या शेतकऱ्याकडे बँकेचे कर्मचारी वसुलीसाठी गेल्याची घटना समोर आली आहे. आजारी माणसालाही कर्जवसुलीच्या दबावातून सुटका मिळत नसेल, तर आर्थिक व्यवहारांमध्ये माणुसकीला नेमके स्थान कुठे आहे?, असा प्रश्न उपस्थित होतो. कर्जाची वसुली करणे हा वित्तीय संस्थांचा अधिकार असला, तरी त्यासाठी कायद्याची चौकट आणि मानवी प्रतिष्ठेचे भान पाळणे ही त्यांची जबाबदारी आहे.विशेष म्हणजे, राज्याचे मुख्यमंत्री, महसूलमंत्री आणि अन्य मंत्री सावकारांनी वसुली करताना माणुसकी दाखवावी, अशा शब्दांत विनंती करत आहेत. मात्र, प्रश्न असा आहे की, कायद्याचे राज्य असताना सरकारला सावकारांना माणुसकीची विनवणी का करावी लागत आहे? बेकायदेशीर सावकारी, अवाजवी व्याजदर, धमकावणे आणि जबरदस्तीने वसुली करणे याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार शासनाकडे आहेत. मग केवळ आवाहने आणि विनंत्यांवर सरकारची भूमिका का थांबते? नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सावकारांचे परवाने रद्द करणे, आर्थिक व्यवहारांची चौकशी करणे आणि दोषींवर कठोर गुन्हे दाखल करणे यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यायला हवा.मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुली प्रक्रियेवरही प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे. कर्जदारांना धमकावणे, सार्वजनिक ठिकाणी अपमानित करणे, घरातील सदस्यांवर दबाव आणणे किंवा आजारपण आणि नैसर्गिक संकटाच्या काळातही अवास्तव वसुलीचा तगादा लावणे अशा प्रकारांना आळा बसला पाहिजे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करून तक्रारींवर तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे. बेकायदेशीर सावकारीविरोधात पोलिस, महसूल आणि सहकार विभागाने संयुक्तपणे मोहीम राबवली पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी केवळ सावकारांवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. पीककर्जाची सुलभ उपलब्धता, वेळेवर पीकविमा भरपाई, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई, सिंचनाच्या सुविधा आणि ग्रामीण भागात संस्थात्मक कर्जव्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्ज पुनर्गठन आणि परतफेडीसाठी सवलती देण्याबाबतही शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे प्रत्येक राजकीय व्यासपीठावर सांगितले जाते. मात्र, त्याच शेतकऱ्याला कर्जाच्या वसुलीसाठी अपमान, धमक्या आणि हिंसाचाराचा सामना करावा लागत असेल, तर या गौरवाच्या शब्दांना अर्थ उरत नाही. शेतकऱ्यांना मदतीच्या घोषणा नव्हे, तर संकटाच्या काळात आधार देणारी यंत्रणा हवी आहे. सावकारांच्या मनमानीला लगाम घालण्यासाठी सरकारने आता विनवण्यांचे राजकारण बाजूला ठेवून कायद्याचा धाक निर्माण करावा. अन्यथा कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण आणि मानसिक छळ थांबणार नाही. शेतकऱ्याचा जीव वाचवणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आता कठोर उपाययोजनांशिवाय पर्याय नाही!**

# देश महासत्ता होईल; नागरिक कधी सुजाण होतील?



**प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार**

आपल्याला स्वच्छ भारत हवा आहे, सुंदर शहरे हवी आहेत, चकचकीत रस्ते हवे आहेत, नद्या निर्मळ हव्या आहेत; पण या सगळ्यांसाठी स्वतःच्या हातातील कचरा कचरापेटीत टाकण्याचे कष्ट मात्र नको आहेत! आपल्या देशात Civic Senre नावाचा एक दुर्मिळ पक्षी आहे. त्याचे नाव सगळ्यांनी ऐकले आहे; पण दर्शन मात्र फार थोड्यांना झाले आहे! हा पक्षी सरकारी जाहिरातींमध्ये, भाषणांमध्ये आणि स्वच्छतेच्या शपथांमध्ये अधूनमधून दिसतो; प्रत्यक्ष रस्त्यावर मात्र त्याचा मागमूसही सापडत नाही. घरातील फरशीवर धुळीचा कण पडला तरी अस्वस्थ होणारा माणूस घराबाहेर पडताच कचऱ्याचा बादशहा बनतो. गाडीच्या खिडकीतून प्लास्टिकची बाटली, चॉकलेटचे आवरण किंवा चिप्सचे पाकीट रस्त्यावर फेकताना त्याच्या हाताला जराही कँप सुटत नाही. बहुधा त्याच्या मनात एकच विचार असतो, रस्ता सरकारचा आहे, स्वच्छ करणेही सरकारचेच काम! म्हणजे घरातील कचरा घराबाहेर फेकला की तो जणू राष्ट्रीय संपत्ती बनतो! घरात स्वच्छता आणि बाहेर अस्वच्छता, हा आपल्या संस्कारांचा विलक्षण चमत्कार आहे. काही लोक तर सार्वजनिक भिंतींना आपल्या पान-तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी रंगवण्याचे सामाजिक कार्य अत्यंत निष्ठेने करतात. त्यांच्या कलाकृतींना ना रंगाची गरज, ना कुंचल्याची; फक्त पानाचा तोबरा आणि भिंतीची उपलब्धता पुरेशी असते! लिफ्ट, जिने, बसस्थानके, रेल्वेस्थानके आणि सार्वजनिक स्वच्छतागृहे यांना लाल रंगाची सजावट करण्याचा हा उपक्रम पाहिला की स्वच्छतेच्या संकल्पनेलाच चक्कर यावी. आपण घराला मंदिरासारखे स्वच्छ ठेवतो; पण सार्वजनिक जागांना कचराकुंडी समजतो. काही ठिकाणी दुकानदार फुटपाथवरच आपला माल मांडतात. पादचाऱ्यांसाठी असलेला फुटपाथ हळूहळू दुकानाचा विस्तार बनतो आणि पादचाऱ्यांना मात्र वाहनांच्या गर्दीतून जीव मुठीत धरून चालावे लागते. सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करण्याऐवजी भिंतींचा गैरवापर करणारेही कमी नाहीत. स्वच्छतेचा फोटो समाजमाध्यमांवर झळकतो; पण स्वच्छतेचा संस्कार मात्र आपल्या वर्तनात उतरायला तयार नाही. स्वच्छ भारत अभियानात झाडू हातात घेऊन छायाचित्र काढणे सोपे आहे; मात्र स्वतःच्या हातातील कचरा योग्य ठिकाणी टाकणे एवढे कठीण का वाटते? जणू स्वच्छता ही दाखवण्याची गोष्ट आहे, जगण्याची नाही!

रस्त्यावर उतरल्यावर आपल्या नागरी शिस्तीचा आणखी एक रंग पाहायला मिळतो. वाहतुकीचे नियम हे जणू दुसऱ्यांसाठीच असतात, अशी काही वाहनचालकांची ठाम समजूत असते. लाल सिग्नल दिसला की थांबण्याऐवजी त्यांच्या मनातील घड्याळ अधिक वेगाने धावू लागते. सिग्नलचा रंग लाल असला तरी घाईचा रंग हिरवा असतो, असा काहींचा खासगी वाहतूक नियम असावा! चुकीच्या बाजूने वाहन चालवणे, फुटपाथवर गाडी चढवणे, रस्त्याच्या मधोमध वाहन उभे करणे, दुहेरी पार्किंग करणे आणि पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालण्याची शिक्षा देणे, हे सारे प्रकार इतक्या सहजपणे घडतात की रस्ते सार्वजनिक आहेत की प्रत्येकाने आपापल्या मर्जीने ताब्यात घेतलेली खासगी मालमत्ता, असा प्रश्न पडतो. हॉर्न तर काही वाहनचालकांच्या हातातील जणू काही जादूची कांडीच! समोरचा वाहनचालक हलला नाही की हॉर्न; पादचारी रस्ता ओलांडू लागला की हॉर्न; सिग्नल हिरवा होण्यापूर्वीच हॉर्न! हॉर्न वाजवला की रस्ता आपोआप मोकळा होतो, असा त्यांचा समज असावा. काही तरुण दुचाकीस्वारांनी तर आवाजाच्या बाबतीत वेगळेच विश्व निर्माण केले आहे. सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज काढणे, रात्रीच्या शांततेत इंजिनचा गडगडाट करणे आणि रस्त्यावरून जाताना परिसरातील प्रत्येकाला आपल्या गाडीच्या सामर्थ्याची जाणीव करून देणे, यात त्यांना कसलेसे समाधान मिळत असावे. अर्थात, सर्व तरुण असे नाहीत; पण काहींच्या बेजबाबदारपणाचा त्रास संपूर्ण परिसराला सहन करावा लागतो. गाडीला इंजिन दिले आहे, ढोलकी नाही; आणि रस्ता दिला आहे, ध्वनिवर्धक यंत्रणेचे मैदान नाही! रात्री झोपलेल्या वृद्धांना, आजारी माणसांना आणि लहान मुलांना आपल्या गाडीच्या आवाजाने जागे करणे, हा काही पराक्रम नव्हे. लग्नसमारंभ, मिरवणुका, वाढदिवस आणि धार्मिक उत्सवांमध्येही आवाजाचा जणू महासंग्राम सुरू असतो. आनंद व्यक्त करण्यासाठी ध्वनिक्षेपकाचा आवाज किती मोठा असावा, याची स्पर्धा असते; पण शेजाऱ्याच्या घरात आजारी माणूस आहे का, याचा विचार करण्याची कुणाला फुरसत नसते. फटाक्यांच्या आतषबाजीत ध्वनी आणि वायुप्रदूषणाची भर पडते. उत्सव संपल्यानंतर रस्त्यावर पडलेले कागद, प्लास्टिक आणि सजावटीचे अवशेष जणू उत्सवाच्या आठवणी म्हणून मागे ठेवले जातात. स्वतःचा आनंद साजरा करण्यासाठी दुसऱ्याची शांतता हिरावून घेणे, याला उत्साह म्हणायचे की असंवेदनशीलतेचा उत्सव? आनंद साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; पण त्या आनंदाचा आवाज दुसऱ्याच्या घरात घुसवण्याचा अधिकार कोणालाही नाही.

श्रद्धा ही माणसाच्या मनाला निर्मळ करणारी शक्ती असते; पण काही वेळा श्रद्धेच्या नावाखाली निसर्गाच्या निर्मळतेवरच घाव घातला जातो. आपण नदीला माता म्हणतो, तिची पूजा करतो, तिच्या पाण्याला पवित्र मानतो; पण त्याच नदीच्या कुशीत निर्माल्य, प्लास्टिकच्या पिशव्या, सजावटीचे साहित्य आणि पूजेचा कचरा टाकताना आपले हात अजिबात थांबत नाहीत. नदीला माता म्हणायचे आणि तिच्याच पाण्यात कचऱ्याचा संसार थाटायचा, हा भक्तीचा कोणता नवा प्रकार? देवाला फुले वाहून त्याच देवाच्या सृष्टीतील पाणी प्रदूषित करणे, याला भक्ती म्हणायची की भक्तीच्या नावाखाली केलेली पर्यावरणाची विटंबना? श्रद्धा मनात असावी, निर्माल्य नदीत नव्हे! निर्माल्य संकलन केंद्रे उभारणे, त्यापासून खतनिर्मिती करणे आणि पर्यावरणपूरक विसर्जन व्यवस्था वापरणे असे पर्याय उपलब्ध असताना नदीला कचराकुंडी बनवण्याची गरजच काय? नदीतील पाणी, जलचर आणि संपूर्ण परिसंस्था यांच्यावर या कृतींचा परिणाम होतो, याची जाणीव असायला हवी. सार्वजनिक ठिकाणी रांग लावण्याची वेळ आली की आपल्यातील शिस्त आणखी एका कोपऱ्यात जाऊन बसते. बँक असो, रुग्णालय असो, तिकीट खिडकी असो किंवा मंदिर असो, रांगेत पुढे जाण्यासाठी होणारी धडपड पाहिली की जणू काही रांग मोडण्याचा विशेष अधिकारच आपल्याला मिळाला आहे, असे वाटते. दुसऱ्याचा वेळ महत्त्वाचा नाही, दुसऱ्याची गैरसोय महत्त्वाची नाही; फक्त आपले काम आधी झाले पाहिजे! सार्वजनिक बाकांवर नावे कोरणे, भिंतींवर प्रेमाचे संदेश लिहिणे, ऐतिहासिक वास्तूंवर आपली नावे उमटवणे, शौचालयांची नासधूस करणे, नळ उघडे ठेवणे, दिवे फोडणे आणि झाडांची तोडफोड करणे, हीदेखील आपल्या नागरी जाणिवांचीच वेगवेगळी रूपे आहेत. स्वतःच्या घरातील खुर्चीला ओरखडा पडला तरी मन दुखावणारे हात सार्वजनिक बाक मोडताना मात्र सामाजिक जबाबदारी विसरतात. सार्वजनिक मालमत्ता म्हणजे कोणाचीच नाही असे नव्हे; ती सर्वांची आहे. पण सर्वांची या शब्दाचा अर्थ आपण बहुधा माझी नाही असाच घेतला आहे!

जगातील काही देशांनी नागरी शिस्तीला केवळ नियमांच्या चौकटीत बंदिस्त न ठेवता ती जीवनशैलीचा भाग बनवले आहे. जपानमध्ये विद्यार्थी शाळेच्या वर्गखोल्या आणि परिसर स्वच्छ ठेवण्याच्या कामात सहभागी होतात. त्यामुळे स्वच्छता ही दुसऱ्याने करून द्यायची गोष्ट नसून प्रत्येकाची जबाबदारी आहे, हा संस्कार बालवयातच रुजतो. सिंगापूरमध्ये सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे आणि नियम मोडणे याबाबत कठोर दंडात्मक व्यवस्था आहे. स्वित्झर्लंड आणि जर्मनी सारख्या देशांमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर आणि सार्वजनिक नियमांचे पालन याबाबत नागरिकांमध्ये शिस्त दिसून येते. रवांडा या आफ्रिकन देशात उमुगांडा (Umuganda) नावाची सामुदायिक श्रमदानाची परंपरा आहे. या उपक्रमांतर्गत नागरिक दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी एकत्र येऊन सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, रस्त्यांची देखभाल, वृक्षारोपण आणि इतर समाजोपयोगी कामे करतात. म्हणजे सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ सरकारी यंत्रणेची नसून नागरिकांचीही आहे, ही जाणीव ते कृतीतून दाखवून देतात. या देशांचे अंधानुकरण करण्याची गरज नाही; पण त्यांच्या वर्तनामागील सामाजिक भान समजून घेण्याची गरज आहे. आपल्याकडे मात्र परदेशातील स्वच्छ रस्त्यांचे फोटो समाजमाध्यमांवर टाकताना आपण मागे-पुढे पाहत नाही; पण आपल्या घरासमोरचा कचरा उचलण्यासाठी हात पुढे करताना मात्र प्रतिष्ठेला धक्का बसतो! विचारांनी जपानी, पोस्टमध्ये सिंगापुरी आणि कृतीत मात्र कचऱ्याचे साम्राज्य, अशी आपली अवस्था झाली आहे. आजच्या काळात नागरी जाणिवांना सेल्फी आणि रील्सच्या नव्या दिखाऊपणानेही ग्रासले आहे. एखाद्या ऐतिहासिक वास्तूजवळ, नदीच्या घाटावर, उद्यानात किंवा स्वच्छतेच्या मोहिमेत झाडू हातात घेऊन छायाचित्र काढायचे; ते समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करायचे आणि त्याच परिसरात कचरा टाकून पुढे निघून जायचे! जणू स्वच्छतेचे काम करण्यापेक्षा स्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर स्वतःचा फोटो काढणे हेच अधिक महत्त्वाचे झाले आहे. काहींना प्रत्येक प्रसंगात स्वतःचा चेहरा दिसला पाहिजे; सार्वजनिक ठिकाणाचे सौंदर्य, स्वच्छता किंवा शांतता यापेक्षा सेल्फीतील स्वतःचा चेहरा अधिक महत्त्वाचा वाटतो. रील बनवण्यासाठी रस्ता अडवणे, उद्यानातील फुलझाडांमध्ये घुसून छायाचित्रे काढणे, ऐतिहासिक वास्तूंच्या भिंतींवर नावे कोरणे किंवा इतरांच्या हालचालींना अडथळा निर्माण करणे, याला अभिव्यक्तिस्वातंत्र्य म्हणता येणार नाही. अपघात घडला की जखमी व्यक्तीला मदतीचा हात देण्याऐवजी काही जण मोबाईल कॅमेरे पुढे करतात. एखाद्याच्या वेदना काहींसाठी समाजमाध्यमांवरील दृश्यसामग्री बनतात, ही संवेदनशीलतेची किती दुर्दैवी घसरण आहे! मोबाईलचा कॅमेरा कितीही आधुनिक झाला, तरी त्यामागील माणसाची सामाजिक जाणीव आधुनिक झालीच पाहिजे असे नाही! स्वच्छतेचा फोटो काढण्यापेक्षा स्वच्छता राखणे, मदतीचा व्हिडिओ बनवण्यापेक्षा प्रत्यक्ष मदतीला धावणे आणि निसर्गासोबत सेल्फी घेण्यापेक्षा निसर्गाचे रक्षण करणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण समाजाला आपल्या छायाचित्रांची नव्हे, तर आपल्या जबाबदार कृतींची गरज आहे.

मात्र नागरी जाणिवांच्या अभावाबद्दल बोलताना केवळ नागरिकांना दोष देऊन प्रशासनाला मोकळे होता येणार नाही. कचरापेट्या उपलब्ध नसतील, कचरा वेळेवर उचलला जात नसेल, सार्वजनिक स्वच्छतागृहे अपुरी किंवा अस्वच्छ असतील, सांडपाण्याची योग्य व्यवस्था नसेल आणि नियम मोडणाऱ्यांवर कारवाई होत नसेल, तर स्वच्छतेची अपेक्षा केवळ भाषणांतून पूर्ण होणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, कचरा संकलन नियमित करणे, नद्या आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे, फुटपाथ अतिक्रमणमुक्त करणे आणि वाहतुकीचे नियम काटेकोरपणे राबवणे आवश्यक आहे. नियम केवळ पुस्तकात छापून उपयोग नाही; त्यांना अंमलबजावणीची जोड हवी. पण प्रशासनाने परिसर स्वच्छ केला आणि नागरिकांनी दुसऱ्याच दिवशी तो पुन्हा अस्वच्छ केला, तर स्वच्छतेचा हा खेळ किती दिवस चालणार? एका बाजूला कर्मचारी झाडू मारत असतील आणि दुसऱ्या बाजूला नागरिक कचरा फेकत असतील, तर झाडूचा विजय होणार की कचऱ्याचा? प्रशासनाने सुविधा द्याव्यात, नियमांची अंमलबजावणी करावी आणि नागरिकांनी त्या सुविधांचा जबाबदारीने वापर करावा. या दोन्ही बाजूंच्या सहभागातूनच खऱ्या अर्थाने स्वच्छ आणि शिस्तबद्ध समाज निर्माण होऊ शकतो. नागरी जाणिवांचा जन्म सरकारी परिपत्रकातून होत नाही; तो घरातील वर्तनातून आणि शिक्षणातील संस्कारांतून होतो. मुलांना स्वच्छतेचे धडे देणारे पालकच रस्त्यावर कचरा फेकत असतील, वाहतुकीचे नियम मोडत असतील आणि सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करत असतील, तर मुलांनी कोणता आदर्श घ्यायचा? मुलांच्या हातात पुस्तक देण्यापूर्वी मोठ्यांनी स्वतःच्या वर्तनाचे पुस्तक उघडण्याची गरज आहे. शाळा-महाविद्यालयांतून पदव्या मिळतात, प्रमाणपत्रे मिळतात, ज्ञान मिळते; पण सार्वजनिक जीवनात वावरताना दुसऱ्याचा विचार करण्याची बुद्धी विकसित झाली नाही, तर त्या शिक्षणातील काहीतरी महत्त्वाचे हरवले आहे, असे म्हणावे लागेल. पदव्या भिंतीवर लावता येतात; पण संस्कार रस्त्यावर दिसले पाहिजेत! शिक्षणाचा अर्थ केवळ परीक्षेत गुण मिळवणे किंवा नोकरी मिळवणे एवढाच नाही. इतरांच्या हक्कांचा आदर करणे, सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, पर्यावरणाची काळजी घेणे आणि समाजाच्या हितासाठी स्वतःच्या सोयीवर मर्यादा घालणे, हेही शिक्षणाचेच महत्त्वाचे भाग आहेत. नागरी शिस्त ही एखाद्या सरकारी मोहिमेची किंवा एका दिवसाच्या स्वच्छता अभियानाची गोष्ट नाही; ती रोजच्या जगण्याचा भाग झाली पाहिजे.

शेवटी प्रश्न स्वच्छतेचा नाही, तर आपल्या मानसिकतेचा आहे. आपण कितीही विकासाच्या गप्पा मारल्या, कितीही मोठमोठ्या इमारती उभारल्या, कितीही रुंद रस्ते बांधले, तरी सार्वजनिक जीवनात जबाबदारीची जाणीव नसेल तर त्या विकासाला सुसंस्कृतपणाची किनार लाभणार नाही. संस्कृतीचा अभिमान बाळगणे सोपे आहे; पण त्या संस्कृतीतील सहिष्णुता, संवेदनशीलता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी प्रत्यक्ष आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. दुसऱ्याने आपल्यासाठी काय करावे, याची अपेक्षा करण्यापूर्वी आपण समाजासाठी काय करतो, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. कारण देशाची ओळख केवळ त्याच्या इतिहासाने, परंपरेने किंवा आर्थिक सामर्थ्याने होत नाही; तर त्या देशातील सामान्य नागरिकांच्या वर्तनातूनही घडत असते. आपल्याला जगाने आपली मंदिरे, संस्कृती आणि परंपरा पाहून कौतुक करावे असे वाटते; पण आपल्या नागरी वर्तनाकडे पाहूनही त्यांना आदर वाटावा, अशी वेळ कधी येणार? महासत्ता होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या देशातील नागरिकांना निदान सुजाण नागरिक होण्याचे भान कधी येणार? देश बदलण्यापूर्वी नागरिक म्हणून स्वतःला बदलण्याची तयारी आहे का? की दुसऱ्याला उपदेश देत स्वतः मात्र आहे तसेच राहणार आहोत?

(लेखक हे मराठी विभाग, पीपल्स कॉलेज,नांदेड येथे प्राध्यापक आहेत.)

# अल्पसंख्याक समाजातील तरुणांना पोलीस भरतीपूर्व निवासी प्रशिक्षणाची संधी

नांदेड/प्रतिनिधी-अल्पसंख्याक विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्यामार्फत सन २०२६-२७ या वर्षासाठी राज्यातील अल्पसंख्याक समाजातील इच्छुक उमेदवारांना पोलीस शिपाई भरतीपूर्व निवासी प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी इच्छुक व पात्र नोंदणीकृत प्रशिक्षण संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

शासन निर्णय १७ डिसेंबर २०२१ मधील तरतुदीनुसार जिल्हानिहाय किमान २५ ते कमाल ५० प्रशिक्षणार्थींची निवड करून त्यांना तीन महिन्यांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये अंकगणित, सामान्यज्ञान, चालू घडामोडी, बुद्धिमत्ता चाचणी, मराठी भाषा व व्याकरण तसेच शारीरिक क्षमता या विषयांचा समावेश राहणार आहे. पोलीस शिपाई भरतीच्या लेखी व शारीरिक परीक्षांसाठी उमेदवारांना सक्षम बनविणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे.अर्ज करणारी प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्यातील धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगाव तालुक्यात सुपीक काळ्या जमिनींची सर्रास प्लॉटिंग;कोट्यवधींच्या व्यवहारांचा संशय

**शेख चांदपाशा**

हदगाव:हदगाव शहरासह संपूर्ण तालुक्यातील शहराजवळ गाव रोडच्या बाजूला सुपीक, कसदार काळ्या मातीच्या शेती जमिनींवर आता प्लॉटिंगचा धंदा जोरात सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. ज्या जमिनींमध्ये वर्षानुवर्षे शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन घेत होते, त्याच जमीनी काही धनाडय व्यक्ती शेतकऱ्यांच्या कमीत कमी दराने जमीनी खरेदी करून जमिनींचे तुकडे पाडून निवासी व व्यावसायिक भूखंड म्हणून विक्री केली जात असल्याची चर्चा आहे. या व्यवहारांमधून लाखों रुपाया पासून कोट्यवधी रुपयांपर्यंत आर्थिक उलाढाल होत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, या संपूर्ण व्यवहारांवर महसूल प्रशासनाचे व आयकर विभागाच नियंत्रण आहे की केवळ कागदोपत्री नियमांचे पालन दाखविले जात आहे, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, शेतीसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या जमिनींचे मोठ्या प्रमाणावर भूखंडीकरण होत असताना संबंधित जमिनींचा अकृषिक वापर करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत का? जमीन वापर बदलाची प्रक्रिया नियमानुसार पूर्ण झाली आहे का? लेआउट मंजुरी, रस्ते, खुल्या जागा आणि इतर आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात आली आहे का? असे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, ज्या जमिनींचे भूखंड पाडून विक्री करण्यात येत असल्याची चर्चा आहे, त्याच जमिनींवर यापूर्वी शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ किंवा अनुदान घेतले होते का? घेतले असल्यास त्याचा प्रत्यक्ष वापर कोणत्या कारणासाठी झाला? संबंधित जमिनींच्या नोंदी आणि अनुदान वितरणाची तपासणी करण्यात आली आहे का? याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र, कृषी अनुदानाचा गैरवापर झाल्याचे अद्याप सिद्ध झालेले नसून, या बाबींची अधिकृत पडताळणी होणे गरजेचे आहे.

**महसूल प्रशासन नेमके काय करतेय...?**

हदगाव शहराच्या परिसरासह तालुक्यातील विविध भागांत सुपीक जमिनींचे भूखंडीकरण होत असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर तलाठी, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय आणि संबंधित नियोजन प्राधिकरणाने अशा जमिनींच्या नोंदी व परवानग्यांची तपासणी केली आहे का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नियमबाह्य भूखंडीकरण होत असल्यास त्यावर वेळीच कारवाई का झाली नाही?, याचेही उत्तर प्रशासनाने देणे अपेक्षित आहे.

**तीन विभागांची संयुक्त चौकशी होणार का?**

या संपूर्ण प्रकरणाची महसूल विभाग, कृषी विभाग आणि आयकर विभाग यांनी स्वतंत्रपणे तसेच आवश्यकतेनुसार समन्वयाने सखोल चौकशी करावी. संबंधित जमिनींचे सातबारा उतारे, फेरफार नोंदी, अकृषिक परवानग्या, लेआउट मंजुरी, कृषी अनुदानाची माहिती आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यात यावी. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून पुढे येत आहे.दरम्यान, या प्रकरणातील चर्चांना आणि संशयांना अद्याप कोणत्याही सक्षम यंत्रणेने अधिकृत दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे कोणावरही थेट आरोप करण्याऐवजी संबंधित यंत्रणांनी निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे गरजेचे आहे. वाढत्या शहरीकरणाच्या नावाखाली हदगाव तालुक्यातील कसदार काळ्या जमिनींचे अस्तित्वच धोक्यात येणार नाही ना, अशी चिंता शेतीप्रेमी नागरिक आणि शेतकरी व्यक्त करीत आहेत. एकीकडे शेतजमीन वाचवा, शेतीचे क्षेत्र टिकवा, असा संदेश दिला जात असताना दुसरीकडे सुपीक जमिनींचे प्लॉटिंगमध्ये रूपांतर होत असल्यास भविष्यात शेतीचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन संशयास्पद जमीन व्यवहारांची चौकशी करावी आणि सुपीक जमिनींचे अनियंत्रित भूखंडीकरण रोखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### कोट्यवधींची उलाढाल;आयकर विभागानेही लक्ष घालावे

शेतीच्या जमिनींचे तुकडे करून भूखंडांच्या स्वरूपात विक्री केली जात असल्यास या व्यवहारांमध्ये प्रत्यक्ष किती रक्कम मिळाली, दस्तनोंदणीमध्ये किती किंमत दाखविण्यात आली आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार किती झाले, याची तपासणी होणे आवश्यक आहे. या व्यवहारांमधून मिळालेल्या उत्पन्नाची माहिती संबंधित कर यंत्रणांना देण्यात आली का? आयकर नियमांचे पालन झाले का व्यवहारांमध्ये रोख रकमेचा वापर झाला आहे का या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नांदेड येथील विमानतळावर आगमन

नांदेड/प्रतिनिधी-राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आज सकाळी नांदेड येथील श्री गुरु गोविंद सिंगजी विमानतळावर आगमन झाले.

यावेळी त्यांचे स्वागत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ. प्रताप पाटील चिखलीकर,पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांनी केले.



# गोदावरी काठावरील बेकायदेशीर वीट भट्ट्यांवर कारवाई करण्याचे आदेश

नायगाव/प्रतिनिधी-गोदावरी नदीच्या काठावर सुरू असलेल्या बेकायदेशीर वीटभट्ट्या, अनधिकृत साठे आणि ओव्हरलोड अवजड वाहतुकीच्या गंभीर प्रश्नाची अखेर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दखल घेतली आहे. या प्रकरणी नायगाव आणि बिलोलीच्या तहसीलदारांना पत्र पाठवून संबंधितांवर तातडीने कडक दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे गोदावरी नदीकाठावरील अनधिकृत व्यवसायांवर आता कारवाई होणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

युवासेना नांदेड जिल्हाप्रमुख ओमप्रकाश पाटील धुपेकर यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. गोदावरी नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वीटभट्ट्या उभारण्यात आल्या असून, अनधिकृत साठे आणि क्षमतेपेक्षा अधिक माल वाहून नेणाऱ्या अवजड वाहनांमुळे पर्यावरणाचे नुकसान होत असल्याचा मुद्दा त्यांनी तक्रारीत उपस्थित केला होता. या तक्रारीची दखल घेत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयाने संबंधित तहसीलदारांना कारवाईचे निर्देश दिले आहेत. या पत्रातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयाने आपल्या स्तरावरून कोणत्याही वीटभट्टीला संमतीपत्र दिलेले नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित भागातील वीटभट्ट्यांच्या वैधतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परिशिष्ट ४ मधील क्रमांक ७ नुसार संबंधित भट्टीधारकांविरुद्ध तहसीलदारांनी आपल्या स्तरावर कडक दंडात्मक कारवाई करावी, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने वीटभट्ट्यांसंदर्भात स्पष्ट भूमिका मांडल्यानंतर आता नायगाव आणि बिलोली महसूल प्रशासन कोणती भूमिका घेते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ पत्रव्यवहारापुरती कारवाई मर्यादित न राहता प्रत्यक्ष स्थळपाहणी, अनधिकृत वीटभट्ट्यांची तपासणी, अनधिकृत साठ्यांची चौकशी आणि ओव्हरलोड अवजड वाहतुकीवर कठोर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

# विठ्ठळहून कपिलाधारकडे श्री मन्मथ माऊलीच्या सेवेला धर्मजागरण यात्रा निघणार

उमरखेड/प्रतिनिधी-दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री उमामहेश्वर मन्मथ ज्योत यात्रा विठ्ठळ ते श्रीक्षेत्र कपिलाधार (मांजरसुंभा,बीड) अशी काढण्यात येणार आहे. यंदा यात्रेचे १० वे वर्ष असून, उद्या २१ ते २६ नोव्हेंबर पर्यंत ही धर्मजागरण यात्रा होणार आहे.

शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता श्री उमामहेश्वर संस्थान, विठ्ठळ येथून यात्रेचे प्रस्थान होणार आहे. उमरखेड येथे श्री महात्मा बसवेश्वर संस्थान, शिवाजी वार्ड यांच्या वतीने यात्रेचे भव्य स्वागत करण्यात येणार असून, नास्ता व दुपारच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेदरम्यान पळसा, डोंगरकडा, चाभरा, बारड, अर्धापूर, भोकर फाटा, नांदेड, पारडी, सुनेगाव, पेटशिवणी, पालम, गंगाखेड, परळी, अंबेजोगाई, कोरेगाव आदी ठिकाणी भाविकांकडून चहा-पाणी, नास्ता, जेवण व मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. दि.२३ नोव्हेंबर रोजी सायं.७ वा. श्रीक्षेत्र कपिलाधार, मांजरसुंबा ता. जि. बीड येथे श्री मन्मथ माऊलींच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन श्री उमामहेश्वर मन्मथ ज्योत अर्पण करण्यात येणार आहे. दि.२३ ते २६ नोव्हेंबर दरम्यान स्वच्छ भारत मिशन अंतर्गत यात्रा ठिकाणाची संपूर्ण स्वच्छता व माऊलीची सेवा करण्यात येणार असून, पार्वती चॅरिटेबल ट्रस्ट, उमरखेड यांच्या सहकार्याने आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये डॉ. विष्णुकांत शिवणकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.ओंकार मुळावकर, डॉसुमित कंठाळे, डॉ. शेटे, रामेश्बर आप्पा बिचेवार, सावन स्वामी बेडके, बालाजी शिरडकर, रत्नाकर स्वामी पुजारी, कैलास स्वामी सुकळकर, किसन आप्पा हिंगमिरे, वैजनाथ स्वामी पुजारी,रमेश आप्पा दिल्लेवार, संतोष डोम, आणि रनमले यात्रे दरम्यान आरोग्यसेवा देऊन मोफत औषधी वाटप करणार आहेत.या यात्रेत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री उमामहेश्वर संस्थान, विठ्ठळ, श्री उमामहेश्वर मन्मथ ज्योत यात्रा समिती, विठ्ठळ व समस्त विठ्ठळ ग्रामस्थांनी केले आहे.

# शहराचे पाणी आरक्षित ठेवा;शेतकऱ्यांना तीन पाणीपाळ्या देण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा आवश्यक साठा सुरक्षित, आरक्षित ठेवून विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्यांद्वारे शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुधनांच्या पिण्यासाठी तीन पाणीपाळ्या देण्यात याव्यात, अशी ठाम मागणी विष्णुपुरी शेतकरी लाभार्थी संघर्ष समितीच्या वतीने राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात आली.

आज (शुक्रवारी) सकाळी ९ वाजता नांदेड येथील नियोजन भवनात उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचीही उपस्थिती होती. नांदेड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्यांवर अवलंबून असलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांसमोर शेती आणि उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने रब्बी हंगामासह शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. ग्रामीण भागात शेतकरी आणि पशुधनांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यामुळे प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे न्याय्य आणि पारदर्शक वाटप करणे आवश्यक असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले. नांदेड शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची पुढील कालावधीतील आवश्यक गरज निश्चित करून तेवढा साठा आरक्षित ठेवावा. त्यानंतर उपलब्ध पाण्याचे नियोजन करून शेती आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी कालव्यांद्वारे पाणी द्यावे, अशी स्पष्ट भूमिका शेतकरी प्रतिनिधींनी मांडली. समितीने पूर्वीच्या प्रस्तावानुसार प्रत्येकी ५ दलघमी याप्रमाणे एकूण १५ दलघमी पाणी तीन पाणीपाळ्यांसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच कालवा सल्लागार समितीची तातडीने बैठक घेऊन पाणीपाळ्यांचे वेळापत्रक निश्चित करावे, बंद पंप, कमी क्षमतेने चालणारे पंप आणि पाइपलाईन मधील गळती दुरुस्त करावी, औद्योगिक आणि शेतीच्या पाणी वापराचा पारदर्शक हिशेब जाहीर करावा, अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या.

# दुष्काळातही नायगाव तालुक्यात वृक्षतोडीचा सपाटा!

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक संकटाचा सामना करीत असताना दुसरीकडे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त असताना पर्यावरणाचा आधार असलेल्या झाडांची विनापरवाना तोड होत असल्याचा आरोप होत आहे.

तालुक्यात मोठ्या प्रमाणात वीटभट्ट्या सुरू असून कृष्णूर एमआयडीसी परिसरातील बॉयलर व इतर औद्योगिक कंपन्यांमध्येही लाकडाचा वापर होत असल्याची चर्चा आहे. या उद्योगांना पुरवठा होणारे लाकूड नेमके कुठून आणले जाते? वृक्षतोडीसाठी अधिकृत परवानगी घेतली जाते का? लाकडाची वाहतूक आणि साठवणूक कायदेशीर आहे का? याची चौकशी होणे आवश्यक आहे. वीटभट्ट्या, लाकूड साठवणुकीची ठिकाणे, वाहतूक करणारी वाहने आणि कृष्णूर एमआयडीसीतील संबंधित उद्योगांची वनविभागाने तपासणी करावी. लाकडाचा स्रोत व आवश्यक परवान्यांची पडताळणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दुष्काळात झाडांचे महत्त्व अधिक असताना वृक्षतोडीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होणे चिंताजनक आहे. वनविभाग आणि महसूल प्रशासन संयुक्त चौकशी करणार का? वीटभट्ट्या व औद्योगिक कंपन्यांच्या लाकूड पुरवठ्याचा स्रोत तपासणार का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. दुष्काळाच्या संकटात नायगाव तालुक्याचे पर्यावरण वाचविण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७७३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१९/११/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सय्यद युनुस पि.सय्यद अरशद** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१६५२/१६२ गट क्र.८१७ प्लॉट क्र.१६२** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **खतीब अ.नासेर पि.अ.खय्युम** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ७००/२०२६ दि.२२.६.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.१६३, पश्चिमेस :- प्लॉट क्र.१६१, उत्तरेस :- प्लॉट क्र.१६० व १६४, दक्षिणेस :- २० फुट रुंद रोड

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७७०/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१९/११/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **विकास पि.विजयराव लव्हेकर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७९/३९ गट क्र.१७९ मधील** प्लॉट क्र.**३९** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री स्वामी समर्थ इस्टेटसचे भागीदार १.जितेंद्र पि.प्रकाशचंद जेठाणी व इतर** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १९०८/२०२४ दि.२५.१०.२०२४, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील श्री स्वामी समर्थ नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९.०० मी.रुंद रोड आहे, पश्चिमेस :- प्लॉट क्र.२० आहे, उत्तरेस :- प्लॉट क्र.३८ आहे,दक्षिणेस :- प्लॉट क्र.४० आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७७२/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१९/११/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **कैलास रंगराव कल्याणकर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **३९१/३२ गट क्र.३९१ मधील** प्लॉट क्र.**३२** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शोभाबाई पंचफुला कदम** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ८४८१/२०२६ दि.०४.०९.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील व्यंकटेश नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.३१ आहे, पश्चिमेस :- ओपन स्पेस आहे, उत्तरेस :- गट क्र.१७९ मधील जमीन आहे,दक्षिणेस :- ९.०० मी. रुंद रोड आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७७१/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१९/११/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **गजानन वैजनाथ बेळगे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७९/६८ गट क्र.१७९ मधील** प्लॉट क्र.**६८** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री स्वामी समर्थ इस्टेटसचे भागीदार १.जितेंद्र पि.प्रकाशचंद जेठाणी व इतर** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १४०३/२०२६ दि.१५.१०.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील श्री स्वामी समर्थ नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.७६ आहे, पश्चिमेस :- ९.०० मी.रुंद रोड आहे, उत्तरेस :- प्लॉट क्र.६९ आहे,दक्षिणेस :- प्लॉट क्र.६७ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते कंधार येथे तीन महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे लोकार्पण

## शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय,उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि विकसित उद्यान नागरिकांच्या सेवेत




नांदेड/प्रतिनिधी-कंधार शहराच्या विकासात महत्त्वपूर्ण भर घालणाऱ्या शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर विकसित उद्यानाचे लोकार्पण आज राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

या तीन महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे कंधार परिसरातील नागरिकांना आरोग्य, प्रशासकीय सेवा आणि मनोरंजनाच्या अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामुळे परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यास मदत होणार असून, उपविभागीय अधिकारी कार्यालयामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होणार आहे. तसेच विकसित उद्यानामुळे नागरिकांना विरंगुळ्यासाठी एक चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमास राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.बालाजी कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता रुपा राऊळ, उपविभागीय अधिकारी विलास नरवटे यांच्यासह विविध पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा बँक निवडणुकीवरुन महायुतीत धुसफूस;भाजपची नाराजी चव्हाट्यावर!

सातारा:सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीवरून महायुतीमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा समोर आले आहेत. बँकेच्या निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक संचालक निवडून आले असतानाही अध्यक्षपदाच्या निवडीत भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यात आल्याने पक्षातील नाराजी उघड झाली आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) स्थानिक नेत्यांनी भाजपला विश्वासात न घेता पदाधिकारी निवडीची प्रक्रिया पूर्ण केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

जिल्हा बँकेच्या संचालक मंडळात भाजपचे नऊ संचालक निवडून आले होते. त्यामुळे अध्यक्षपदावर भाजपचा दावा प्रबळ मानला जात होता. मात्र, शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद पाटील यांनी एकत्रित भूमिका घेत उदयसिंह उंडाळकर यांची अध्यक्षपदी, तर शिवसेनेचे दीपक चव्हाण यांची उपाध्यक्षपदी निवड होण्याचा मार्ग मोकळा केला. या घडामोडीत भाजपचे मंत्री जयकुमार गोरे यांना अध्यक्षपदापासून दूर ठेवण्यात आल्याने भाजपच्या स्थानिक नेतृत्वात अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.विशेष म्हणजे, राज्यात भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे तिन्ही पक्ष सत्तेत एकत्र असले, तरी स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे वेगळी असल्याचे या निवडीने स्पष्ट केले आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीवेळीही मित्रपक्षांमध्ये राजकीय चढाओढ पाहायला मिळाली होती. त्यावेळी भाजपने शिवसेना आणि राष्ट्रवादीला अडचणीत आणण्याची भूमिका घेतल्याची चर्चा होती. त्यातून निर्माण झालेला तणाव अद्याप पूर्णपणे निवळलेला नसल्याचे या ताज्या घडामोडींवरून दिसून येते.

# दुष्काळात बोअरचा व्यवसाय तेजीत;शेतकऱ्यांची आर्थिक लूट

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील अनेक गावात कोरड्या दुष्काळाची तीव्रता वाढत असून विहिरींनी तळ गाठला आहे, तर तलाव आणि जलस्रोत आटू लागले आहेत. पावसाअभावी शेतातील पिके करपू लागल्याने शेतकरी चिंतेत आहेत. विशेषतः लाखोंचा खर्च करून लागवड केलेले पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची बोर खोदाईसाठी धडपड सुरू आहे. याच संधीचा फायदा घेत बोअर व्यवसायिकांनी दर वाढविल्याने दुष्काळातही बोअर खोदाईचा व्यवसाय तेजीत आला आहे.

देगलूर तालुक्यातील अनेक गावातील विहिरी आणि बोरवेलची पाणी पातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. दिवस-रात्र सुरू असलेल्या मोटारीचे पाणी आता केवळ तास-दोन तासच उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यासमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हळद पिकाला वेळेवर पाणी मिळाले नाही तर लागवडीसाठी केलेला लाखोंचा खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.त्यामुळे पाणी मिळण्याच्या आशेने अनेक शेतकरी एकापाठोपाठ एक बोअर खोदत आहेत. सध्या बोअर खोदाईसाठी प्रति फूट ११० ते १२० रुपये, तर केसिंगसाठी ४०० ते ४५० रुपये दर आकारला जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पाणी लागण्याची शाश्वती नसतानाही खोदाई आणि केसिंगचा संपूर्ण खर्च शेतकऱ्यांना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी ६०० ते ८०० फूट खोदाई करूनही पाणी लागत नसल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडत आहे बोअर,किसिंग आणि मोटारीसाठी लाखोंचा खर्च करूनही पाणी न मिळाल्यास शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहेत. भूजल उपशासंदर्भातील नियमानुसार बोअरवेल खोदाईवर आवश्यक निर्बंध आणि अंतराचे निकष लागू असताना अनेक ठिकाणी परवानग्या व नियमांची पूर्तता न करताच खोदाई सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकारावर संबंधित यंत्रणेचे नियंत्रण आहे का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुष्काळात शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक आणि पाण्याचा अनियंत्रित उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

# सातबारा लिंक नाही म्हणून ५ हजारांची मदत अडकली;शेतकऱ्यांत संताप

उमरखेड/प्रतिनिधी-शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा दावा केला जात असतानाच, प्रशासकीय आणि तांत्रिक त्रुटींमुळे फार्मर आयडी असूनही तो सातबारा उताऱ्याशी लिंक नसल्यामुळे उमरखेड तालुक्यातील असंख्य शेतकरी शासनाच्या ५ हजार रुपयांच्या दुष्काळी मदतीपासून वंचित राहत आहेत.

विशेष म्हणजे, फार्मर आयडी काढताना शेतकऱ्यांनी सातबारा उताऱ्यासह सर्व कागदपत्रे दिली होती. तरीही आज अनेक शेतकऱ्यांचा फार्मर आयडी सातबाऱ्याशी ऑनलाइन जोडला गेलेला नाही. त्यामुळे अनुदान प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. आधीच दुष्काळ, नापिकी, वाढता शेती खर्च आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना ५ हजारांची मदतही मिळत नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. चूक शेतकऱ्यांची नसताना शिक्षा त्यांनाच का? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत. महसूल व कृषी विभागाने तातडीने सदर बाबीची गंभीर दखल घेऊन फार्मर आयडी व सातबारा जोडणीसाठी विशेष मोहीम राबवावी आणि पात्र शेतकऱ्यांना तातडीने मदत वितरित करावी, अशी मागणी दुष्काळी मदतीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांन कडून केली जात आहे. फार्मर आयडी सातबाऱ्याला लिंक करण्यासाठी शेतकऱ्यांना सीएससी केंद्राच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत. अनेक चकरा मारूनही तांत्रिक त्रुटीचे कारण सांगत सीएससी केंद्र चालकाकडून ३०० रुपये घेतले जात असल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये आहे.

> याबाबत तहसीलदार साहेबांनी स्वतः लक्ष द्यावे. फार्मर आयडीमध्ये अडचण असली तरी सातबारा असलेल्या शेतकऱ्यांची इतर शहानिशा न करता थेट अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करावी.
> **- अनिल कदम,** तालुकाध्यक्ष,काँग्रेस

# हदगाव मतदारसंघातील वीजपुरवठ्याच्या समस्या प्राधान्याने सोडवा-ना.बोर्डीकर

मुंबई/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील हदगाव विधानसभा मतदारसंघातील वीजपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावेत. तसेच नवीन वीज उपकेंद्रांची उभारणी, रोहित्रांची क्षमता वाढविणे आणि वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण याबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

हदगाव मतदारसंघातील ऊर्जा विभागाच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी मतदारसंघातील कमी दाबाने होणारा वीजपुरवठा, लांब अंतरावरील उपकेंद्रांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि नवीन उपकेंद्रांची आवश्यकता याबाबत मागण्या मांडल्या.मतदारसंघातील मानवाडी येथे १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा. तसेच लोहा, मुदखेड आणि इतर प्रस्तावित उपकेंद्रांच्या कामांची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.निगहा बाजार, रावणगाव, रुई, बेलमंडळ आणि चाफळा येथील उपकेंद्रांच्या प्रस्तावांसह अतिरिक्त रोहित्रांची आवश्यकता, वीजवाहिन्यांचे काम आणि शेतीपंपांना सुरळीत वीजपुरवठा या विषयांचाही आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रस्तावांची पुनर्तपासणी करून आवश्यक कामांचा समावेश आगामी नियोजनात करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## थकबाकीदार वीज ग्राहकांचा अभय योजनेत सहभाग

नांदेड/प्रतिनिधी-वीज बिलांच्या थकबाकीमुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित बिगरकृषी वीज ग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना २०२६-२७' सुरु असून अवघ्या १५ दिवसांत नांदेड परिमंडलातील १३३५ ग्राहकांनी प्रत्यक्ष अर्ज करुन योजनेत सहभाग नोंदवला आहे. त्यापैकी ३३३ ग्राहकांनी २९.५० लाख रुपयांचा थकित वीजबिल भरणा केलेला आहे.

# लाकडाची जागा घेतली लोखंडाने; ग्रामीण जीवनशैलीत बदलाची नवी चाहूल

देगलूर/प्रतिनिधी-काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले आणि त्यासोबत ग्रामीण भागातील जीवनशैलीतही मोठे परिवर्तन घडू लागले आहे. एकेकाळी ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या लाकडी वस्तूंची जागा आता हळूहळू लोखंडी साहित्याने घेतली आहे. त्यामुळे सुतार कारागीरावर उपासमारीची वेळ आली आहे.

बैलगाडी, नांगर, वखर, दावण्या, घरातील लाकडी खाटा, पाट, पाटे-वरवंटे, धान्य साठवण्याच्या पेट्या अशा अनेक वस्तूंना विशेष महत्त्व होते. सुतार समाजातील कारागीर आपल्या कौशल्यातून या वस्तू तयार करीत असत प्रत्येक वस्तू तयार करताना लाकडाचा प्रकार, त्याची गुणवत्ता आणि वापर याचा विचार केला जात असे. या वस्तूमध्ये केवळ उपयोगिताच नव्हती, तर ग्रामीण संस्कृतीची आणि परंपरेची ओळखही दडलेली होती. मात्र बदलत्या काळानुसार या वस्तूचे स्वरूप बदलू लागले आहे. पूर्वी लाकडापासून तयार होणाऱ्या बैलगाडीला आता लोखंडी सांगाड्याची जोड मिळाली आहे.शेतीच्या नांगरापासून वखर, कुळव, आणि इतर अवजारामध्येही लोखंडाचा वापर वाढला आहे. घरगुती वापरातील खाटा, कपाटे, दरवाजे, खुर्च्या, टेबल, धान्य साठविण्याचे साहित्य तसेच शेतीसाठी लागणाऱ्या विविध साधनांमध्ये लोखंडी साहित्याला प्राधान्य दिले जात आहे. लाकडी वस्तू तयार करण्यासाठी चांगल्या प्रतीचे लाकूड मिळविणे, त्यावर प्रक्रिया करणे आणि कुशल कारागिराकडून वस्तू तयार करून घेणे यासाठी वेळ आणि खर्च लागतो. दुसरीकडे लोखंडी साहित्य सहज उपलब्ध होत असल्याने गरजेनुसार त्यापासून विविध वस्तू तयार करता येतात. योग्य रंगोटी आणि देखभाल केल्यास लोखंडी वस्तू दीर्घकाळ वापरता येतात. तूट फूट झाल्यास वेल्डिंगच्या माध्यमातून दुरुस्ती करणेही शक्य होते. त्यामुळे शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांचा लोखंडी साहित्याकडे कल वाढला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुग्णालयात जावून सौ.पूनमताई पवार यांच्या प्रकृतीची केली विचारपूस



नायगाव/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील सर एच. एन. रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात जाऊन सौ. पूनमताई राजेश पवार यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली.पत्नीच्या आजारपणामुळे कठीण काळातून जात असलेल्या आ.राजेश पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मुख्यमंत्र्यांची ही अनपेक्षित भेट भावनिक आधार देणारी ठरली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुग्णालयात तब्बल अर्धा तास थांबून पूनमताई यांच्या आजारपणाची, सुरू असलेल्या उपचारांची आणि प्रकृतीतील सुधारणेची माहिती घेतली. तसेच उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी सविस्तर चर्चा करून पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन केले. मुख्यमंत्र्यांना आजाराविषयी आणि आधुनिक उपचार पद्धतींबाबत असलेली माहिती पाहून राजेश पवार दाम्पत्याने आश्चर्य व्यक्त केले. त्यांच्या प्रत्येक प्रश्नातून पूनमताई यांच्या प्रकृतीबद्दलची काळजी आणि आत्मीयता जाणवत होती. राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची मोठी जबाबदारी सांभाळताना व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून कोणतीही पूर्वकल्पना न देता रुग्णालयात पोहोचणे, ही बाब राजेश पवार दाम्पत्यासाठी विशेष भावनिक ठरली. या भेटीवेळी मुख्यमंत्री नव्हे, तर कुटुंबातील मोठा भाऊ कठीण प्रसंगी धीर देण्यासाठी आल्याची भावना झाल्याचे राजेश पवार यांनी व्यक्त केले. गेल्या काही आठवड्यांपासून पूनमताई यांच्या उपचारांमुळे संपूर्ण कुटुंब कठीण परिस्थितीतून जात आहे. अशा वेळी मुख्यमंत्र्यांनी स्वतः भेट देऊन दाखवलेली आपुलकी, दिलेला धीर आणि व्यक्त केलेली काळजी यामुळे पूनमताई यांनाही नवे मानसिक बळ व आत्मविश्वास मिळाल्याचे राजेश पवार यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या या अनपेक्षित भेटीबद्दल आमदार राजेश पवार आणि सौ. पूनम राजेश पवार यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. पदापेक्षा माणुसकी, संवेदनशीलता आणि दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्याची भावना मोठी असते. कठीण काळात मिळालेला हा मायेचा आधार आणि जिव्हाळा आयुष्यभर हृदयात जपून ठेवू, अशा भावना राजेश पवार दाम्पत्याने व्यक्त केल्या.

पान १ वरुन

## अकवान चक्रीवादळाचा...

तापमान १० अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. सकाळच्या सुमारास दाट धुक्यामुळे थंडीत आणखी भर पडली.उत्तर प्रदेशातही थंडीची लाट तीव्र झाली असून, १५ हून अधिक जिल्ह्यांना दाट धुक्याने वेढले आहे. राजधानी लखनौसह कानपूर, उन्नाव, मऊ, मेरठ, आग्रा, अलीगढ, नोएडा आणि गाझियाबादमध्ये धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाली आहे.दरम्यान, उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनारपट्टीजवळ पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात असलेली चक्रीवादळ प्रणाली गेल्या सहा तासांत ताशी २६ किलोमीटर वेगाने उत्तर-वायव्य दिशेने सरकल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. त्यामुळे पूर्व किनारपट्टीवरील पावसाची स्थिती आणि उत्तर भारतातील थंडी याकडे हवामान विभागाचे लक्ष लागले आहे.

## देशातील संपत्तीचे केंद्रीयकरण...

शिक्षणपद्धतीत शिकवले जाणारे ज्ञान आणि प्रत्यक्ष रोजगाराच्या गरजा यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे.उच्च शिक्षण घेऊनही तरुणांना रोजगार मिळत नसल्याचे वास्तव त्यांनी उदाहरणांसह मांडले. रोजगार निर्मितीच्या नियोजनाबाबत चीनमधील उदाहरण देताना स्थानिक पातळीवर भविष्यातील रोजगाराची गरज लक्षात घेऊन शिक्षण आणि कौशल्यविकासाचे नियोजन करण्याची पद्धत त्यांनी विशद केली. भारतातही स्थानिक उद्योग, शेती आणि उपलब्ध रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन शिक्षणक्रम तयार करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.आर्थिक विषमता कमी करणे, लोकशाही व्यवस्था मजबूत करणे आणि शिक्षण व रोजगार यांच्यातील दरी दूर करणे ही देशासमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. युवकांनी पुढाकार घेऊन सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन कॉ. डॉ. अजित नवले यांनी केले. कॉ.विजय गाभणे यांनी अध्यक्षीय समारोप केला तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ.लक्ष्मण शिंदे यांनी केले. यावेळी ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर, डीवायएफआयचे भट्टाचार्य यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.घाटगे यांनी तर आभार प्रदर्शन कपिल धुतमल यांनी केले.

पान १ वरुन

## दुष्काळ निवारणासाठी...

उपलब्ध करून द्यावे. तसेच सक्तीची कर्ज वसुली करू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ८९१.३० मि.मी. असून, ३१ ऑक्टोबर २०२६ अखेर ५९६.३० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ६६.९० टक्के पाऊस झाला आहे. या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलसाठे, टँकर व्यवस्था, विहीर व बोअरवेल अधिग्रहण आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. संभाव्य टंचाई लक्षात घेऊन गावनिहाय पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे आणि पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले. दुष्काळाचा फटका शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी आणि पशुधनाला कमीत कमी बसेल, यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावे. पाण्याचा काटकसरीने वापर करून अपव्यय टाळावा, असे आवाहनही त्यांनी केले. दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान सामूहिक प्रयत्नांतूनच परतवून लावता येईल. शासन जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे असून, नागरिकांना दिलासा देण्यासाठी सर्व उपाययोजना प्राधान्याने राबवाव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

## वंचित शेतकऱ्यांच्या प्रकरणांची...

जमीन नोंदी आणि चुकीची अथवा विसंगत माहिती यामुळे काही फार्मर आयडींची पडताळणी रखडली आहे. अशा प्रकरणांची छाननी करून पात्र शेतकऱ्यांना निर्धारित निकषांनुसार मदत देण्याची प्रक्रिया सुरू आहे.दरम्यान, गेल्या १५ दिवसांत चार लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी नव्याने फार्मर आयडी प्राप्त केले आहेत. या शेतकऱ्यांच्या नोंदींची निर्धारित प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्रतेनुसार त्यांचाही मदतीसाठी विचार केला जाणार आहे. त्यामुळे फार्मर आयडी किंवा तांत्रिक कारणांमुळे मदत प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.मदत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी लाभार्थ्यांची यादी आणि वितरित केलेल्या मदतीचा तपशील संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४